दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/३८/२०१९
दि.१५/०४/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ...............अपिलार्थी
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.२१/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईंदर शहरातील प्रभागनिहाय सिवरेज कर आकारणी करण्यात येते त्याची माहिती द्यावी.
२) एकुण कर जमा झाला त्याचा तपशिल द्यावा. सदर करांतर्गत लोकांना ज्या सोयीसुविधा पुरवल्या जातात त्याचा तपशिल द्यावा.
३) सदर माहिती प्रभागनिहाय व सरळ भाषेत देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत जाणूनबुजून माहिती लपविल्याने अपिलार्थी यांनी दि.२६/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/५२/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/६४/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

Scanned by CamScanner

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) हे सुनावणीस उपस्थित आहेत व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस अनुपस्थित आहेत.

१) <u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>:- माझ्या दि.२१/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी हे जाणून बुजून आम्हाला माहिती देण्यास टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने अजून पर्यंत माझ्या माहिती अधिकाराच्या अर्जावर त्यांनी उत्तर दिलेले नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अजून पर्यंत माहिती का उपलब्ध करुन दिली नाही याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात यावा. जाणीवपूर्वक माहिती लपवतात म्हणून त्यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करावी.

२) <u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u> अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांनी विहीत मुदतीत माहिती दिलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी 07 दिवसांच्या आत अपिलार्थी अर्जदारास माहिती विनाशुल्क पुरवावी. तसेच यानंतर माहिती अधिकारावरील प्रत्येक अर्जावर विहीत वेळेत दक्षता घेण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner